# खंडेलवाल इंग्लिश स्कूलमध्ये 'सायबर सिक्युरिटी अवेअरनेस वर्कशॉप'

**अकोला :** सायबर गुन्ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, त्याबाबत विद्यार्थ्यांना पुरेपूर माहिती देण्यासाठी स्थानिक खंडेलवाल इंग्लिश स्कूलमध्ये शुक्रवारी (ता.२) 'सायबर सिक्युरिटी अवेअरनेस वर्कशॉप' मार्गदर्शनात्मक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. इंटरनेट क्रांती ही आजवरची सर्वात मोठी क्रांती मानली जाते. इंटरनेटने सर्वत्र क्षेत्रात प्रवेश केला आहे. ऑनलाइन बॅकींग, ऑनलाइन खरेदी, मेसेजींग, ई-गव्हर्नस, फेसबुक, व्हॉट्सॲप, व्हीडिओकॉल इत्यादी गोष्टीमुळे देशाच्या सिमारेषाही पुसून गेल्या असून जगातले लोक खूप जवळ आले आहेत. वाढत्या इंटरनेटच्या वापराबरोबरच सायबर गुन्हेगारांनी गुन्हेगारीच्या नवनवीन पद्धती शोधून लोकांचा पैसा आणि खासगी गोपनियता याला मोठा धोका निर्माण केला आहे. इंटरनेटचे तंत्रज्ञान वारंवार बदलत असल्यामुळे सायबर गुन्हेगारी रोखण्याचे मोठे आवाहन सध्या आहे. याकरिता शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील कॉम्प्युटर विभागातील विद्यार्थिनी शितल साखरे आणि नेहा टेरे यांनी सायबर क्राईम विषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली. ऑनलाइन मोबाईल खेळताना कोणती काळजी घेण्यात यावी, काय करावे आणि काय करू नये हेही सांगण्यात आले. लहान मुलांनी आपली सायबर सुरक्षा कशी करावी, हाच या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. या कार्यक्रमाला खंडेलवाल इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका पूर्वा कुळकर्णी तसेच वर्गशिक्षक कडू अडायकर, पायल शर्मा, अंजली राऊत यांची उपस्थिती लाभली. सकाळ 04-12-2022